महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ ०१ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १८६ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## महत्वाचे

### मुंबई महापालिकेसाठी भाजपा आणि शिवसेना युतीचं जागावाटपाचं सूत्र निश्चित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई महानगरपालिकेसाठी भाजपा आणि शिवसेना युतीचं जागावाटपाचं सूत्र निश्चित झालं आहे, यानुसार भाजपा १३७ जागा लढणार असून शिवसेना ९० जागा लढवणार आहे. तर रिपब्लिकन पक्षाने स्वतंत्र ३९ जागांची घोषणा केली आहे. काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी आणि रासप एकत्र निवडणूक लढवत आहेत. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या पक्षांनीही काल दिवसभर एबी फॉर्मचं वाटप केलं. मात्र त्यांचं जागावाटप स्पष्ट झालं नाही. दरम्यान, राजु शेट्टी यांच्या स्वाभिमानी पक्षाने महाविकास आघाडीच्या घटक पक्षांना पाठिंबा देण्याचं जाहीर केलं आहे.

### पनवेलमध्ये भाजपनं उघडलं खातं

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल, ता. ३१ (बातमीदार):** पनवेल महापालिकेच्या निवडणूक प्रक्रियेत भाजपने यश संपादन करीत राजकीय वर्चस्व अधिक मजबूत केले आहे. प्रभाग क्रमांक १८ (ब) मधून पक्षाचे उमेदवार नितीन पाटील यांची बिनविरोध नगरसेवकपदी निवड अधिकृतरीत्या घोषित होताच परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. या प्रभागातून शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवाराने दाखल केलेला अर्ज छाननी प्रक्रियेदरम्यान बाद ठरल्याने निवडणूक रिंगणात नितीन पाटील हे एकमेव उमेदवार उरले. परिणामी, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांची बिनविरोध निवड जाहीर केली. नितीन पाटील यांच्या निवडीचे वृत्त कळताच भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांनी एकमेकांना मिठाई भरवत अभिनंदन केले. यामुळे प्रभागात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या बिनविरोध विजयामुळे पालिकेत भाजपची ताकद वाढली असून आगामी राजकीय घडामोडींमध्ये ही निवड निर्णायक ठरणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. नितीन पाटील म्हणाले, की माझ्यावर जनतेने दाखवलेला विश्वास ही मोठी जबाबदारी आहे. प्रभागातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य आणि मूलभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य देण्यात येईल.

### एबी फॉर्मवरील डिजिटल सही उमेदवारांचा घात करणार?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर आज त्याची छाननीही पार पडली. आता पुढील दोन दिवस उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. पण त्याआधीच शिवसेनेने मोठा दावा करत अनेक उमेदवारांची धडधड वाढविली आहे. अनेक पक्षांच्या उमेदवारांच्या ए व बी फॉर्मवर डिजिटल सही असून ते बेकायदेशीर आहे. त्यामुळे त्यांची उमेदवारी रद्द करावी, अशी मागणी शिवसेनेने थेट राज्य निवडणूक आयोगाकडे केली आहे. शिवसेनेचे राज्यसभेचे खासदार मिलिंद देवरा यांनी निवडणूक आयोगाला पत्र पाठवून ही बाब निदर्शनास आणून दिली आहे. महापालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी बहुतांश पक्षांनी निवडणूक आयोगाच्या नियमांचं थेट उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्याचे देवरा यांनी म्हटले आहे.

### माजी नगरसेवकांना डावलले ठाण्यात बंडाळीचं पीक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महापालिकेत शिवसेना-भाजपची युती झाली असून महाविकास आघाडीतून काँग्रेसने बाहेर पडून स्वबळाचा नारा दिला आहे. शिवसेनेला (मित्र पक्षांसह) ९१ जागा तर भाजपला ४० जागा सोडण्यात आल्या आहेत. दुसरीकडे शिवसेनेने धक्का तंत्राचा वापर करीत दिग्गज नगरसेवकांना उमेदवारी नाकारली असताना मुंब्रातील माजी नगरसेवक राजन किणी यांच्यासह चौघांनी शिवसेनेला धक्का देत राष्ट्रवादी काँग्रेसचे घड्याळ हाती घेतले आहे. शिवसेनेचे ठाणे आणि भाजपची मुंबई हे नवीन समीकरण तयार करण्यासाठी भाजपच्या स्थानिक नेत्यांसह कार्यकर्त्यांचा तीव्र विरोध असतानाही शिवसेना आणि भाजपची ठाण्यात युती झाली. आमदारांची नाराजी, कार्यकर्त्यांचा दबाब असूनही एकही जागा वाढवून देण्यास शिवसेनेने नकार दिल्याने भाजपकडे येणारा माजी नगरसेवकांचा लोंढा रोखला गेला. मात्र मुंब्यातील जेष्ठ नगरसेवक राजन किणी यांनी शिवसेनेला धक्का देत पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उडी घेतली आहे.

# महापालिका निवडणुकांच्या नामांकन अर्जांची छाननी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्रातल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत काल संपली. या अर्जांच्या छाननीला सकाळी अकरा वाजता सुरूवात झाली. २ जानेवारीला दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येतील. ३ जानेवारीला निवडणूक चिन्हाचं वाटप होईल, आणि अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध होईल. येत्या १५ जानेवारीला मतदान होणार असून १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे. दरम्यान, मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी एकूण ११ हजार ३९२ उमेदवारी अर्ज वितरित करण्यात आले असून त्यापैकी २ हजार ५१६ अर्ज दाखल झाल्याचं राज्य निवडणूक आयोगानं सांगितलं.

काल अखेरच्या दिवसापर्यंतही अनेक ठिकाणी जागावाटपाचं चित्र स्पष्ट नव्हतं. सर्व राजकीय पक्ष स्थानिक समीकरणं पाहून युती आणि आघाडीचा निर्णय घेत आहेत. अनेक ठिकाणी विरोधी आघाड्यातल्या घटक पक्षांनी एकमेकांशी युती केली तर काही ठिकाणी सर्व पक्षांनी स्वतंत्र लढण्याचं जाहीर केलं. अनेक उमेदवारांनी काल पक्षांतर करून उमेदवारी मिळवली. त्यामुळं राजकीय पक्ष आणि उमेदवारांसह मतदारांमध्ये संभ्रम होता. मुंबई महानगरपालिकेसाठी भाजपा आणि शिवसेना युतीचं जागावाटपाचं सूत्र निश्चित झालं आहे, यानुसार भाजपा १३७ जागा लढणार असून शिवसेना ९० जागा लढवणार आहे. तर रिपब्लिकन पक्षाने स्वतंत्र ३९ जागांची घोषणा केली आहे. काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी आणि रासप एकत्र निवडणूक लढवत आहेत.

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या पक्षांनीही काल दिवसभर एबी फॉर्मचं वाटप केलं. मात्र त्यांचं जागावाटप स्पष्ट झालं नाही. दरम्यान, राजु शेट्टी यांच्या स्वाभिमानी पक्षाने महाविकास आघाडीच्या घटक पक्षांना पाठिंबा देण्याचं जाहीर केलं आहे.

## केडीएमसी निवडणुकीत 122 जागांसाठी 860 अर्ज दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीसाठी 31 प्रभागांतील एकूण 122 जागांसाठी मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत होती. या कालावधीत एकूण 860 उमेदवारी अर्ज दाखल झाल्याची अधिकृत माहिती समोर आली आहे. सकाळी 9 वाजल्यापासूनच इच्छुक उमेदवारांनी आपल्या समर्थकांसह ढोल-ताशे, झेंडे आणि घोषणाबाजी करीत वाजतगाजत मिरवणुका काढल्या. यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाच्या परिसरात प्रचंड गर्दी उसळली होती. कार्यकर्त्यांच्या उत्साहानं आणि राजकीय पक्षांच्या रंगीबेरंगी झेंड्यांनी परिसर पूर्णतः राजकीय रंगात रंगला होता. या निवडणुकीत शिवसेना, भाजपा, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), मनसे, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), वंचित बहुजन आघाडी, आम आदमी पार्टी तसेच, अपक्ष उमेदवारांनी मोठ्या प्रमाणात उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. 9 वेगवेगळ्या निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांमध्ये अंतिम क्षणापर्यंत इच्छुक उमेदवारांना प्रवेश दिल्यानं अर्ज भरण्याची प्रक्रिया सायंकाळी उशिरापर्यंत सुरू होती.

## प्रचार खर्चावर कठोर नियंत्रण

### राज्य निवडणूक आयोगाचा निर्णय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने उमेदवारांच्या प्रचार खर्चासंदर्भात महत्त्वाचे बदल जाहीर केले आहेत. खर्चाची मर्यादा वाढवली असली तरी त्यावर कडक नियंत्रण ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या मार्गदर्शक सूचनांनुसार उमेदवारांनी केलेल्या प्रत्येक प्रचार सभा, मेळावा आणि कार्यक्रमाचे छायाचित्र, खर्चाचा तपशील, खर्चाची अधिकृत बिलं जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे. रोख खर्चावर मर्यादा ठेवत बँक व्यवहार आणि खर्चाचे लेखापरीक्षण करण्यात येणार आहे. मनपा निवडणुकांसाठी उमेदवारांच्या प्रचार खर्चाची कमाल मर्यादा मनपाच्या वर्गवारीनुसार निश्चित केली आहे. त्यानुसार अ वर्ग मनपासाठी १५ लाख रुपये, ब वर्गासाठी १३ लाख रुपये, क वर्गासाठी ११ लाख रुपये तर ड वर्ग मनपेसाठी ९ लाख रुपयांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. खर्चाच्या नोंदीत उशीर झाला किंवा तफावत आढळल्यास उमेदवारांना नोटीस बजावली जाणार असून, गंभीर उल्लंघन झाल्यास कठोर कारवाईचा इशारा आयोगानं दिला आहे.

**आयोगाने दिलेल्या नियमावलीनुसार विविध भागात प्रभागांचा आकार आणि प्रचाराची व्यप्ती लक्षात घेऊन खर्चाच्या मयदित फरक ठरवण्यात येतो आणि वर्गीकरण करण्यात येते. 'अ' वर्गातील महापालिकांमध्ये उमेदवारांची कमाल मर्यादा 15 लाख रूपये निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये पुणे आणि नागपूर या शहरांचा समावेश आहे. लोकसंख्या, मोठे प्रभाग आणि प्रचारात वापरण्यात येणाऱ्या सामानाची संख्याही भरपूर असते हे लक्षात घेऊन मयदित वाढ करण्यात आली आहे. यामध्ये जाहिरात, सभा, वाहन खर्च, प्रचार साहित्य याचा समावेश आहे. 'ब' वर्गातील महानगरपालिकांमध्ये ही मर्यादा 'अ' वर्गापेक्षा कमी ठेवण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड, नाशिक आणि ठाणे या शहरांतील उमेदवारांना जास्तीत जास्त 13 लाख रुपये खर्च करता येणार आहेत. ही शहरे वेगाने वाढणारी असून प्रचाराची गरज मोठी असली तरी तुलनेने मर्यादा कमी ठेवण्यात आली आहे.**

## भाजपनेच उधळला पहिला गुलाल

### कल्याण डोंबिवलीत भाजपची हॅट्रिक - बहुमतापासून केवळ 58 जागा दूर



**प्रभाग क्रमांक 11 मधून भाजपच्या रेखा चौधरी प्रभाग क्रमांक 18 मधून आसावरी नवरे आणि रंजना मितेश पेंडकर बिनविरोध विजय घोषित. भाजपच्या या तिन्ही विजयी उमेदवारांचे भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष, आमदार रवींद्र चव्हाण यांनी अभिनंदन केले. या तिन्ही विजयी उमेदवारांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी दूरध्वनीवरून अभिनंदन केले. असून गुलालाची उढळण करत विजयी उमेदवारांची शहरातून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत भाजपाने (BJP) महायुतीच्या विजयाचा शुभारंभ केला. येथील प्रभाग क्र. 18 मधून रेखाताई चौधरी आणि प्रभाग क्र.26-क मधून आसावरीताई केदार नवरे यांची नगरसेविकपदी बिनविरोध निवड झाली. या विजयानंतर भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण (Ravindra chavan) यांनी दोन्हीही विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले. यावेळी, चव्हाण यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरुन दोन्ही महिला उमेदवारांचे बोलणे करुन दिले. त्यामुळे, मुख्यमंत्री फडणवीस यांनीही दोन्ही उमेदवारांचे अभिनंदन केले. आता, केडीएमसी (KDMC) महापालिकेत तिसरा उमेदवार विजयी झाला आहे. कल्याण डोंबिवली महापालिकेत भाजपने हॅट्रिक केली असून तिसरा उमेदवार बिनविरोध विजयी झाला.

कल्याण डोंबिवली महापालिका निवडणुकीतील प्रभाग क्रमांक 26 ब मधून भाजपच्या रंजना मीतेश पेणकर बिनविरोध निवडून आल्या आहेत. त्यामुळे, भाजपने येथील महापालिकेत विजयाची हॅट्रिक केली असून स्वबळावरील विजयासाठी किंवा सत्ता स्थापनेसाठी भाजप केवळ 57 जागा दूर आहे. 122 जागा असलेल्या केडीएमसी महापालिकेत भाजपा 65 आणि शिवसेना 57 जागांवर निवडणूक लढवत आहे. त्यामुळे, भाजप शिवसेना युतीच्या एकूण 122 जागांपैकी भाजपने तीन जागा जिंकत आघाडी घेतली आहे. भाजपा महायुतीला येथील विजयासाठी, सत्ता स्थापनेसाठी 61 जिंकाव्या लॉगतील.

भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी कल्याण डोंबिवलीचा गड राखल्याचं पाहायला मिळत आहे. कारण, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण प्रथम नगरसेवक म्हणून निवडून आलेल्या प्रभागातही भाजप उमेदवाराची बिनविरोध निवड झाली आहे. डोंबिवली विधानसभेमधील स्वातंत्र्यवीर सावरकर रोड प्रभागात भाजपचा तिसरा विजय झाला आहे. या प्रभागामध्ये नगरसेवक म्हणून पहिल्यांदा रविंद्र चव्हाण निवडून आले होते, हा प्रभाग भाजपचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. याच प्रभाग 26 ब मध्ये भाजपच्या बालेकिल्यामध्ये रंजना मितेश पेणकर यांची बिनविरोध निवड झाल्याने भाजप समर्थकांनी आनंद व्यक्त केला आहे. रेखा चौधरी, आसावरी नवरे यांच्यानंतर आता रंजना पेणकर बिनविरोध विजयी झाल्याने भाजपने केडीएमसी महापालिकेत तिसरा विजय मिळवला आहे.

### महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने

## उल्हासनगरात विरोधकांची गट्टी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगरः** उल्हासनगर महापालिकेच्या निवडणुकीसाठी मंगळवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत उमेदवारांची धावाधाव आणि पळापळ पाहायला मिळाली. इच्छित राजकीय पक्षाने उमेदवारी न दिल्याने अनेकांनी विरोधी पक्षात जाऊन अर्ज दाखल केला. येथे शिवसेना शिंदे गटाने येथे कलानी गटाशी युती केली असून साई पक्षही त्यांच्या सोबत आहे. तर भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार) स्वतंत्रपणे रिंगणात आहेत. दुसरीकडे शिवसेना (उबाठा), मनसे आणि काँग्रेसने आघाडीतून अर्ज दाखल केले आहेत.

गेल्या निवडणुकीत एकमेकांच्या विरोधात असलेले विरोधक पालिका निवडणुकांच्या निमित्ताने एकत्र आल्याचे चित्र उल्हासनगरात आहे. लोकसभा आणि विधासभा निवडणूक एकत्र लढवणारे शिवसेना (शिंदे), भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यंदा एकमेकांविरूद्ध निवडणुकीच्या रिंगणात आहेत. भाजप आणि शिवसेनेने युती होणार नसल्याचे अर्ज भरण्याला दोन दिवस शिल्लक असताना जाहीर केले. त्यामुळे अनके इच्छुकांचा जीव भांड्यात पडला. मात्र त्यानंतरही अनेकांना पक्षातर्फे उमेदवारी मिळू शकली नाही. त्यामुळे सोमवारी रात्रभर आणि मंगळवारी दुपारपर्यंत उमेदवार राजकीय पक्षाच्या एबी अर्जाच्या प्रतिक्षेत पाहायला मिळाले.

उल्हासनगरात ७८ जागांसाठी निवडणूक होते आहे. चार सदस्यीय प्रभाग पद्धतीत २० प्रभागांसाठी मंगळवारी अर्ज भरले गेले. सहा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात सकाळपासूनच वर्दळ पाहायला मिळत होती. अर्ज दाखल करताना गोंधळ नको म्हणून चोख पोलीस बंदोबस्त होता. गेल्या अनेक वर्षांपासून युवा सेना अध्यक्ष असलेल्या बाळा श्रीखंडे यांनी शेवटच्या क्षणाला भाजपात जाऊन प्रभाग क्रमांक एकमधून अर्ज दाखल केला. तर त्यांचे सहकारी म्हणून ओळखले जाणारे सुनील सिंग यांच्या पत्नीने साई पक्षाकडून अर्ज दाखल केला. मनसेच्या जिल्हा उपाध्यक्ष प्रदिप गोडसे यांनी शिवसेनेत (शिंदे) प्रवेश केला. भाजपाच्या माजी नगरसेविका जयश्री पाटील यांनी कलानी गटात प्रवेश केला. कलानी गटाचे निष्ठावंत समजल्या जाणाऱ्या संतोष पांडे यांनी अपक्ष अर्ज दाखल केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या. भाजपचे निलेश बोबडे यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करत प्रभाग १५ मधून अर्ज दाखल केला. यासह अनेकांनी अपक्ष म्हणून रिंगणात उडी घेतली. त्यामुळे येत्या काळात बंडखोरांना थंड करण्याचे आव्हान सर्व पक्षियांसमोर आहे.

## संयम, संवाद आणि समजुतीने नाराजांची नाराजी दूर करु - रविंद्र चव्हाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

(प्रतिनिधी)

**डोंबिवली :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी, युती आणि कार्यकर्त्यांमधील नाराजी यावर भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी स्पष्ट आणि संतुलित भूमिका मांडली आहे. काही प्रभागांत त्यांच्या समोर कोणताही प्रतिस्पर्धी उमेदवारी अर्ज दाखल न झाल्याने दोन महिला उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे त्यांनी सांगितले. ही प्रक्रिया कुठल्याही दबावातून झालेली नसून, त्या भागातील सर्व कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवारांनी एकमताने घेतलेला निर्णय असल्याचे चव्हाण यांनी स्पष्ट केले. "या उमेदवार चांगल्या आहेत, काम करण्याची क्षमता आहे आणि त्या भागात स्वीकारार्ह आहेत, या दृष्टिकोनातून सर्वांनी त्यांना पाठिंबा दिला. या निर्णयात सहभागी असलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे मी मनापासून आभार मानतो," असे चव्हाण म्हणाले. युतीच्या भूमिकेबाबत बोलताना चव्हाण यांनी ठामपणे सांगितले की, कल्याण-डोंबिवलीत महापौर हा महायुतीचाच होईल. त्यामुळे अनेक ठिकाणी विविध पक्षांतील कार्यकर्त्यांनीही व्यापक राजकीय वास्तव लक्षात घेऊन महायुतीला थोडाफार पाठिंबा देण्याचे ठरवले आहे. "निवडणुका चांगल्या, शांत आणि सकारात्मक वातावरणात पार पडणे गरजेचे आहे. त्यासाठी जे कोणी सहकार्य करत आहेत, त्यांचेही मी आभार मानतो," असे ते म्हणाले.



"पक्ष मोठा आहे, इच्छुकही अनेक आहेत. प्रत्येकाला उमेदवारी देता येत नाही, पण प्रत्येक कार्यकर्ता आमच्यासाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळे कुणालाही दुर्लक्षित न करता सर्वांची समजूत काढली जाईल," असे सांगत चव्हाण यांनी नेतृत्वाची संयमी आणि समन्वयाची भूमिका अधोरेखित केली.



# वाचन संस्कृतीचा महामेरू



**डॉ. राजेंद्र कुंभार**

वाचन ही संस्कृतीची पायाभरणी आहे, माणसाच्या मनाला दिशा देणारी शक्ती आहे आणि समाजाला प्रगल्भतेकडे नेणारा दीपस्तंभ आहे. आधुनिक युगातील तांत्रिक प्रगती, मोबाईलचे व्यसन, बदलती कौटुंबिक रचना आणि वेगवान जीवनशैली यामुळे वाचनाची आवड कमी होत चालली आहे, असे मोठ्या प्रमाणावर दिसते. अशा वेळी महाराष्ट्राच्या वाचन चळवळीला पुनर्जीवित करण्यासाठी, मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांना वाचनाकडे ओढ लावण्यासाठी अथक प्रयत्न करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचे नाव घेतले तर एक नाव ठळकपणे पुढे येते—डॉ. राजेंद्र कुंभार. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागातील निवृत्त प्राध्यापक असलेले डॉ. कुंभार हे वाचन या विषयाला केवळ अभ्यासाचा भाग म्हणून नव्हे, तर जीवनशैली म्हणून प्रोत्साहन देणारे विचारवंत आहेत. १ ते १५ जानेवारीदरम्यान साजरा होणाऱ्या वाचन पंधरवड्याच्या निमित्ताने वाचनसंस्कृतीचा सातत्याने प्रसार करणाऱ्या या ध्येयवेड्या प्राध्यापकाबद्दल बोलणे म्हणजेच वाचनाच्या व्यापक चळवळीबद्दल बोलणे होय.

डॉ. कुंभार यांचे विचार ऐकताना एक गोष्ट ठामपणे जाणवते—वाचन ही गोष्ट घरातून सुरू होणारी संस्कृती आहे आणि त्याची पेरणी जितकी लवकर होईल तितकी ती फळेल. त्यांच्या अनेक व्याख्यानांत त्यांनी "वाचू घाला" हा शब्दशः मंत्र दिला आहे. ते म्हणतात, "जसं आपण मुलांना पाळण्यात असतानाच खाऊ घालतो, तसं त्यांना शब्द, कथा, गाणी वाचू घाला." पाळण्यातल्या बाळाला वाचून दाखवणे हा त्यांच्या मते वाचनसंस्कृतीचा पहिला टप्पा आहे आणि तो टप्पा जितका मजबूत, तितके पुढील आयुष्य समृद्ध.

अनेक पालकांच्या तक्रारी असतात की मुलं मोबाईलमध्ये गुंतलेली असतात, अभ्यासाकडे लक्ष देत नाहीत. त्यांना ते अत्यंत शांतपणे सांगतात—"मुलांना मोबाईलपासून दुर ठेवण्यासाठी त्यांना पर्याय द्या, आणि तो पर्याय म्हणजे पुस्तक वाचन." आणि लगेच ते मुलांसाठी योग्य पुस्तकांची यादीही सांगतात. एखाद्या दहा वर्षांच्या मुलासाठी हलकी-फुलकी कथा, प्रेरणादायी प्रसंग, छोट्या गोष्टींची पुस्तके, तर तरुणांसाठी विचारांना चालना देणारी साहित्यकृती—असे ते सहजपणे सुचवतात. त्यांच्या बोलण्यात "पुस्तकांची दुनिया" नावाची एक नवी, आकर्षक दुनिया उलगडते.

डॉ. कुंभार यांच्याकडे पुस्तकांचा एक विलक्षण मोठा साठा आहे. मात्र खास गोष्ट म्हणजे ते साठा फक्त संग्रहित केलेला नाही; त्यातील प्रत्येक पुस्तक वाचलेले आहे, समजलेले आहे आणि योग्य प्रसंगाला कोणाला सुचवायचे हे देखील त्यांना उत्तमपणे माहीत असते. त्यांच्या शेकडो व्याख्यानांत ते रॉबिन शर्मा यांचे पुस्तके, 'मन मे है विश्वास' , 'वाचनवाटा ' यांसारख्या पुस्तकांचा हवाला देतात आणि हे पुस्तक कोणत्या परिस्थितीत कोणाला कसे उपयोगी पडेल, हे समजावून सांगतात.

त्यांच्या व्याख्यानांत मला विशेष जाणवलेली गोष्ट म्हणजे वाचन केवळ मनोरंजन नव्हे, तर जीवन व्यवस्थापनाचे श्रेष्ठ साधन आहे, असा त्यांचा ठाम विश्वास. कुणाला नैराश्य वाटत असेल तर प्रेरक साहित्य वाचा, मन अस्थिर असेल तर आत्मचरित्र वाचा, करिअरमध्ये गोंधळ असेल तर कौशल्य वाढवणाऱ्या पुस्तकांकडे वळा, आणि आयुष्याचा खोल अर्थ शोधायचा असेल तर आध्यात्मिक साहित्य वाचा—असे स्पष्ट मार्गदर्शन ते करतात.

डॉ. कुंभार यांच्या वाचनप्रसाराच्या कामात आधुनिक माध्यमांचाही ते अत्यंत प्रभावी वापर करतात. ते केवळ पुस्तकांची नावे सुचवून थांबत नाहीत; तर वाचकांनी योग्य पुस्तके शोधण्यासाठी कोणत्या जागतिक वेबसाईट्सचा वापर करावा याचाही मार्गदर्शनपर सल्ला देतात. गुडरीड्स डॉट कॉम सारख्या जगप्रसिद्ध वेबसाईटवर लाखो वाचक एकत्र येऊन पुस्तकांचे अभिप्राय शेअर करतात, शिफारसी देतात आणि वाचनसूची तयार करतात—हे ते सांगतात. त्याचप्रमाणे फँटॅस्टिक फिक्शन सारख्या उत्कृष्ट वेबसाईटवर जगभरातील कथालेखक, कादंबऱ्या आणि नवीन प्रकाशनांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध असते, याचेही महत्त्व ते सांगतात.

याहूनही पुढे ते एक अत्यंत महत्वाची गोष्ट अधोरेखित करतात—वाचनातून व्यवसाय उभा राहू शकतो. आज जगभरात वाचन सल्ला देणाऱ्या अनेक वेबसाईट्स मोठ्या प्रमाणात कमाई करत आहेत, लाखो रुपयांचा वार्षिक उत्पन्न मिळवत आहेत. त्या कोणती पुस्तके वाचावीत, कोणत्या वयोगटासाठी काय उपयुक्त आहे, कोणत्या प्रकारच्या वाचकाला कोणते साहित्य सांगायचे—यासारख्या सेवांसाठी जग पैसे देत आहे.

ते पुण्यातील एक अत्यंत प्रेरणादायी उदाहरण सांगतात—विजय डोईफोडे या उत्साही युवकाने २०१६ मध्ये 'विनया चल ग्रंथालय' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली. सुरुवातीला फक्त ४० पुस्तकांचा खजिना आणि सायकल एवढ्याच साधनांवर हा उपक्रम सुरू झाला. घराघरांत जाऊन दर महिन्याला पाच पुस्तके भाडेतत्वावर देण्याची सेवा त्यांनी सुरू केली. फक्त ३०० रुपयांच्या मासिक वर्गणीवर चालणाऱ्या या उपक्रमाचे आज ५०० पेक्षा जास्त सभासद आहेत. सतत नवी पुस्तके जोडत, वाचकांच्या आवडी समजून घेत हा उपक्रम इतका वाढला की सायकलवर सुरू झालेले हे ग्रंथालय आज चारचाकी गाडीतून सेवा देत आहे. हे उदाहरण सांगताना डॉ. कुंभार यांचा आवाज नेहमीच अभिमानाने भरलेला असतो, कारण त्यांना वाटते की वाचन ही फक्त छंद नाही, तर समाजाला रोजगार देणारी अर्थव्यवस्था बनू शकते.

अनेकांना भीती वाटते की मोबाइलच्या युगात वाचन चळवळ संपून जाईल का? तेव्हा डॉ. कुंभार ठामपणे उत्तर देतात—"वाचन कधीही संपणार नाही; उलट वाढतच जाणार आहे." यासाठी ते प्रत्यक्ष उदाहरणेही देतात. नुकताच नागपूरमध्ये आणि पुण्यामध्ये मागच्या वर्षी झालेल्या पुस्तक मेळाव्यात लाखो रुपयांच्या पुस्तकांची विक्री झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनी दरवर्षी दादर येथे लाखो रुपयांच्या पुस्तकांची खरेदी केली जाते. ही पुस्तके लोक घरी शोभा वाढवण्यासाठी आणत नाहीत—ती वाचण्यासाठीच घेतली जातात. कारण महाराष्ट्राची वाचन परंपरा खोल आहे, आणि ही परंपरा कधीही थांबणारी नाही, असा त्यांचा ठाम विश्वास असतो.

**लेखक : डॉ. दत्तात्रय काळबांडे**
**ग्रंथपाल व आयक्यूएसी समन्वयक,**
**जे. वाटुमल साधुबेला महिला महाविद्यालय, उल्हासनगर**

डॉ. कुंभार यांनी केवळ व्याख्याने दिली नाहीत, तर वाचनाचा जागरभर प्रसार व्हावा यासाठी त्यांनी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागात त्यांनी 'वाचक सल्लागार सेवा' हा चार क्रेडिटांचा विषय सुरू केला, जो महाराष्ट्रातच नव्हे तर देशातही अनोखा मानला जातो. या विषयात विद्यार्थ्यांना वाचकांच्या गरजांनुसार पुस्तके सुचवण्याचे कौशल्य शिकवले जाते. वाचकाची प्रोफाइल जाणणे, त्याच्या आवडी-निवडी समजणे, त्याच्या मानसिक स्थितीनुसार योग्य साहित्य सुचवणे—हे सर्व कौशल्य ते प्रत्यक्ष प्रशिक्षणाद्वारे शिकवतात. भावी ग्रंथपालांनी ही सेवा पुस्तकालयांमध्ये राबवावी, असे ते आग्रहाने सांगतात.

त्यांच्या अनेक यूट्यूब मुलाखतींमध्ये ते म्हणतात, "ग्रंथपालाने पुस्तकें फक्त ठेवायची नसतात; वाचकाला पुस्तकापर्यंत पोचवण्याचा पूल बनायचं असतं." आज त्यांच्या प्रशिक्षणातून गेलेले शेकडो विद्यार्थी महाराष्ट्रातील विविध ग्रंथालयांमध्ये उत्कृष्ट वाचकमार्गदर्शन सेवा देताना दिसतात, हे त्यांच्या कार्याचे मोठे फलित आहे.

डॉ. कुंभार यांनी ग्रामीण भागापासून महानगरांपर्यंत, शाळांपासून विद्यापीठांपर्यंत, सार्वजनिक वाचनालयांपासून सोसायटीतील छोट्या सभांपर्यंत अशा असंख्य ठिकाणी वाचनाबद्दल प्रबोधन केले आहे. ते मोठ्या व्यासपीठावर बोलत असोत किंवा छोट्या—त्यांचा उत्साह, ऊर्जा आणि वाचनावरील प्रेम कधीही कमी होत नाही. त्यांची भाषाशैली साधी, संवाद साधणारी आणि थेट मनाला भिडणारी असते. श्रोत्यांच्या डोळयांत नवचैतन्य जागृत व्हावे, वाचनाची नवी उमेद निर्माण व्हावी—यासाठी ते दरवेळी प्रयत्न करतात.

त्यांच्या शेकडो व्याख्यानांमधील एक महत्त्वाचा संदेश असा आहे की वाचन म्हणजे स्वतःची ओळख शोधण्याचा प्रवास. पुस्तकांच्या अक्षरांतून वाट काढताना आपण आपल्या विचारविश्वाशी संवाद साधतो. या संवादातून निर्माण होणारी स्पष्टता, सहिष्णुता, करुणा, कुतूहल आणि कल्पनाशक्ती हीच माणसाला खऱ्या अर्थाने मोठं बनवते.

वाचन पंधरवड्याच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्र वाचन उपक्रमांनी गजबजून जातो. पण या उपक्रमांना अर्थपूर्ण दिशा देणारे, वाचनाला आयुष्यभराचा संस्कार बनवणारे आणि समाजात वाचनाचे संस्कार पुन्हा रुजवणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. राजेंद्र कुंभार. त्यांचे कार्य हे केवळ शिक्षक म्हणून नाही, तर एक वाचनप्रेमी समाजघटक म्हणूनदेखील अतिशय महत्त्वाचे आहे.

महाराष्ट्रात वाचन संस्कृतीला जर राष्ट्रीय ओळख मिळत असेल, तर त्या मागे डॉ. कुंभार यांसारखे निस्सीम काम करणारे विचारवंत उभे आहेत. पुस्तकांच्या प्रेमात रमलेला एक शांत, मृदू आणि समृद्ध करणारा आवाज म्हणजे डॉ. राजेंद्र कुंभार. वाचनाच्या उजेडाने जग उजळून टाकणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाला वाचन पंधरवड्याच्या निमित्ताने मनापासून सलाम.

# नवीन वर्षाचे स्वागत



**आले आले नवीन वर्ष**
**साजरे करताना होतोय हर्ष**
**सफल जनाचा होवो उत्कर्ष**
**आयुष्यात लाभो सुखाचा स्पर्श**

नवीन वर्ष म्हटले की नवीन आशा ह्या वसंत ऋतुत झाडांना फुटणाऱ्या पालवी सारख्या पल्लवीत होत्या. सरत्या वर्षाला रामराम करुन नवीन वर्षाचे स्वागत करायला उत्साह संचारतो. नवनवीन कल्पना डोक्यात धंगावत असतात. त्या अंमलात आणण्यासाठी प्रेरणा मिळते. गत काळ विसरुन नवीन वर्ष कसे घालवायचे ते आपण ठरवायचे असते कारण आपणच आपल्या जीवनाचा शिल्पकार असतो.

नवीन वर्षाची सुरुवात चांगली झाली की संपूर्ण वर्ष आनंदात घालवू शकतो. संकल्प ते सिध्दी असा प्रवास करावा लागतो, नववर्षाला सामोरे जाताना नेहमी अशक्य काहीच नाही है लक्षात ठेवा, नवीन वर्ष सुरु व्हायला काही दिवस बाकी आहेत. नवीन वर्षात आपल्यापैकी काहीजण आपण सगळेच काहीतरी संकल्प करतो त्यासाठी १ तारीख किंवा सोमवारची वाट पाहात असतो. पण खर सांगायचे तर तशी परफेक्ट वेळ येत नाही. काही गोष्टी कधीच सोप्या होत नाही, संघर्ष कधीच संपत नाही. आता नाही उद्या करेन म्हणत वेळ मागे आपण ढकलत असते आणि तसाही उद्या काही उजडत नाही.

मी एके ठिकाणी वाचले होते की, ज्या ज्या गोष्टींना डेडलाईन नसते त्या आपण कधीच करत नाही आणि गंमत अशी की आयुष्यातील सगळयात महत्त्वाच्या गोष्टींना डेडलाईन नसते. आयुष्यात प्रथम स्वतःसाठी वेळ काढणे, हे फार महत्त्वाचे आहे तितकेच व्यायाम करणे आवश्यक आहे. आरोग्याची काळजी घेणे हे सगळे आपण सतत कधीही करु शकतो, असा विचार करुन टाळतो. कोणीही आपल्याला सांगायला येणार नाही की आपली स्वतःचा जबाबदारी आहे नवीन वर्षात माझ्यासाठी सगळयात महत्य चे काय आहे. ह्याचा विचार करून त्यासाठी किती पैसे, वेळ आणि एनर्जी खर्च करावी लागते. तसेच माझ्या प्रायोरिटीज ठरविताना, माझी मूल्यतत्व कशावर आधारलेली आहेत? ह्याचा पूरेपूर विचार केला पाहिजे.

संकल्प करणे म्हणजे फक्त दुकानातल्या सामानासारख्थी यादी करणे नाही ती यादी किती महत्वाची आहे हे समजून घेणं आहे. एखादी गोए महत्वाची असेल तर तिच्यासाठी वेळ, पैसा आणि उर्जा ह्या तिन्ही गोष्टीपणाला लावायला लागतात.

**- लीना बल्लाळ**
**9920524424**

जगातील विविध देशात 31 डिसेंबरचे संध्याकाळ सरत्या वर्षाला निरोप देत वेगवेगळ्या पध्दतीने साजरी केली जाते. ग्रेगारियन कॅलेंडरमध्ये नवीन वर्षांची संध्याकाळ ज्याला ऑल इयर डे म्हणून ओळखले जाते. वर्षाच्या शेवटचा दिवस धूमधुडाक्यात साजरा करतात अनेक देशामध्ये नवीन वर्षाची संध्याकाळ नृत्य, खाणे, पिणे आणि फटाके पेटवून साजरी केली जाते. आधुनिक काळातील नवीन वर्षाची सुरुवात इ.स.पू. मध्ये ज्यूलियस सीझर सत्तेवर आल्यानंतर त्याने खगोलशास्त्रज्ञ आणि गणिततडा सो सिंजेनस ह्याला बरोबर घेऊन कैलेडरमध्ये सुधारणा घडवून । जानेवारी नवीन वर्ष मानू लागले. 1 जानेवारी ही तारीख रोमन देवाच्या सन्मानासाठी निवडली गेली. सरत्या वर्षाला निरोप देत नवी स्वप्न, नव्या आशा, नवी उमेद व नाविन्याची कास धरत-नवीन वर्षाचे स्वागत करु नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा ।

**मना मनातून आज उजळले आनंदाचे लक्ष दिवे समृध्दीच्या या नजराना घेऊन आले वर्ष नवे. नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !**

# टेंभरे गावातील मुरबाडी नदीचा पूल मोजतोय अखेरची घटका

## कोसळण्याआधी नविन पूल बांधण्याची ग्रामस्थांची मागणी!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील टेंभरे (बु.) गावाच्या हद्दीत गावाबाहेर ये -जा करण्यासाठी असलेला मुरबाडी नदीवरील एकमेव रहदारीचा पूल अत्यंत धोकादायक अवस्थेत असून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मोठ्या दुर्घटनेचा धोका निर्माण झाला आहे. सुमारे ४० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेला हा पूल आता पूर्णतः कमकुवत झाला असून त्याचे पिलर जुन्या दगडी बनावटीचे व झिजलेले असल्याचे ग्रामस्थ सांगतात.

अलीकडेच ठुणे येथे पुल कोसळण्याची घटना घडूनही प्रशासनाने कोणताही धडा घेतलेला दिसत नाही. टेंभरे (बु.) येथेही त्याच प्रकारची पुनरावृत्ती होण्याची वाट प्रशासन पाहत आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. हा पूल कोसळल्यास संपूर्ण गावाचा तालुक्याशी असलेला संपर्क तुटणार असून रुग्णवाहिका, शाळकरी विद्यार्थी, शेतकरी, चाकरमानी व दैनंदिन गरजा भागविणाऱ्या नागरिकांचे हाल होणार आहेत. त्यातच गावात रुग्ण, गरोदर महिला, अपंग तसेच वृद्ध संख्या अधिक आहे. त्यामुळे एखादी अनपेक्षित घटना घडल्यास होणाऱ्या परिणामांची कल्पना न केलेली बरी, अशा प्रतिक्रिया उमटत आहेत.

ग्रामस्थांनी अनेकवेळा मागणी करूनही तसेच याबाबत काही वृत्तपत्रांमध्ये बातम्या छापून आल्या असतांना ही अद्याप ठोस उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. "दुर्घटना घडल्यानंतर पाहणी, पंचनामे आणि आश्वासनांचे सोवळे-ओवळे थांबवून प्रशासनाने तात्काळ नवीन पुलाच्या उभारणीचा निर्णय घ्यावा," अशी संतप्त मागणी ग्रामस्थ करत आहेत.



*दरम्यान, सरपंच सुहास केंबारी यांनी बोलतांना सांगितले , "वेळीच उपाययोजना केल्या नाहीत आणि भविष्यात एखादी हानी घडली, तर त्याची सर्वस्वी जबाबदारी बांधकाम विभागावर राहील. ग्रामस्थ शांत बसणार नाहीत," असा ठामपणे स्पष्ट शब्दांत प्रशासनाला इशारा दिला आहे. *

सदर पुलाची अद्याप संरचनात्मक तपासणी देखील झालेली नसल्याचे सांगण्यात येते. या पार्श्वभूमीवर बांधकाम विभाग व संबंधित प्रशासन तात्काळ घटनास्थळी पाहणी करून पूल बंद करणे, पर्यायी सुरक्षित व्यवस्था उभारणे आणि रात्रीसाठी प्रकाशव्यवस्थेची तजवीज असलेल्या नव्या भक्कम पुलाच्या कामाला तातडीने मंजुरी देणार का? याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

पुलाला अक्षरशः संरक्षण कठडे सुद्धा राहिले नाहीत...

हा पूल इतका जीर्ण झाला आहे की, यावरील सरंक्षण कठडे सुद्धा अक्षरशः शिल्लक राहिले नाहीत. या पुलावरून वाहन नेतांना जणू तारेवरची कसरत करीत असल्याचा धोकादायक अनुभव येत असल्याचे चालक, प्रवाशी सांगतात. तीव्र उतार, शिवाय जागेवरचं वळण; यामुळे जीव मुठीत घेऊन चालकाला आपले वाहन पुलाच्या पलीकडे न्यावे लागत आहे. लवकरच या पुलाची नव्याने उभारणी होणे गरजेचे आहे. अन्यथा एखादी अनपेक्षित हानी घडण्याची दाट संभावना स्पष्ट दिसून येत आहे. रात्रीच्या वेळी परिस्थिती अधिकच धोकादायक बनते. अपुरी प्रकाशव्यवस्था, अरुंद पूल आणि संरक्षण कठड्यांचा अभाव यामुळे अंधारात प्रवास करताना वाहनचालक भयभीत अवस्थेतून मार्गक्रमण करतात. एखादी दुर्घटना घडल्यास तातडीची मदत पोहोचणेही कठीण ठरणार आहे.

# निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात दिड हजारहून अधिक उमेदवारी अर्ज दाखल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : भिवंडी शहर महानगर पालिकेच्या आगामी होणाऱ्या निवडणुकीसाठी महायुती व महाविकास आघाडी होत नसल्याने भाजप, शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या इच्छुक उमेदवारांनी जोरदार शक्ती प्रदर्शन करीत वाजत गाजत आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.भिवंडीतील विविध ठिकाणी असलेल्या सात निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात एकुण अंदाजे एक हजार 80 उमेदवारी अर्ज दाखल झाल्याची माहिती पालिकेच्या जनसंपर्क विभागा कडून देण्यात आली.महापालिकेच्या निमित्ताने शिवसेना भाजप महायुती व काँग्रेस,समाजवादी पक्ष, व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आघाडी होईल अशी अपेक्षा उमेदवार पदाधिकारी व कार्यकर्त्यांना होती मात्र या पक्षांच्या पदाधिकाऱ्यांच्या सर्व बैठका विफल ठरल्याने अखेर नाराज झालेल्या उमेदवारांनी स्वतंत्रपणे आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत काही उमेदवारांना पक्षाने एबी फॉर्म दिलेला नाही तरीह अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल करून बंडाचे निशाण फडकवले आहे.

तर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना व महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाने युती करून आपले उमेदवार उभे केले आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी कोण रिंगणात राहते व कोण उमेदवारी मागे घेणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### भिवंडी महापालिकेची निवडणूक

ही स्वबळावर लढविण्याची तयारी काँग्रेस व समाजवादी पक्षांने करून आपल्या पक्षाच्या उमेदवारांना एबी फॉर्म देत महाविकास आघाडी होण्याचे सर्वाचे स्वप्न भंग केले असले तरी भिवंडी पुर्व विधानसभा मतदारसंघाचे समाजवादी पक्षाचे आमदाराने थेट प्रदेश काँग्रेस पक्षाशी संपर्क साधून काँग्रेस पक्षाच्या इच्छुक उमेदवारांनाडावलून आपल्या समर्थकांना काँग्रेस पक्षाचा एबी फॉर्म वाटप करून काँग्रेस पक्षातील निष्ठावंत पदाधिकारी कार्यकर्ते व इच्छुक उमेदवारांना जोरदार धक्का दिला आहे.यामध्ये माजी खासदार सुरेश टावरे यांच्या मुलाला काँग्रेस पक्षाने उमेदवारी न दिल्यामुळे सुरेश टावरे व टावरे समर्थकांनी तीव्र नाराजी व्यक्त करीत पक्षाच्या या अनोख्या निर्णयाचा बाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे आहे. तर महापालिकेत बलाढ्य अपक्ष गट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोनार्क विकास आघाडीचे माजी महापौर विलास पाटील हे स्वतः मुलासह निवडणुकीचे रिंगणात उतरल्याने विरोधक भाजपा समोर मोठे आव्हान उभे आहे.भिवंडीत समाजवादी पक्षा सोबत महाविकास आघाडी होणार नसल्याचे चित्र स्पष्ट होताच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार) यांच्या पक्षाच्यावतीने 67 ठिकाणी उमेदवार उभे केले आहेत.तर शिवसेना नेते प्रकाश पाटील व उपनेते रुपेश म्हात्रे यांनी वरिष्ठांचे आदेशानुसार भारतीय जनता पक्षासोबत महायुती करणे संदर्भात चर्चा केली मात्र ती विफल ठरल्याने अखेर ठिकठिकाणी स्वतंत्रपणे उमेदवार उभे केले आहेत. हे करत असताना अनेक इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या मात्र त्यांना कोणत्याही प्रकारची उमेदवारी दिलेली नाही त्यामुळे शिवसेनेमध्ये सुद्धा गटबाजी व असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिवसेना व भाजपने सध्या तरी स्वतंत्रपणे पॅनल तयार करून आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.सन 2017 मध्ये महापालिकेच्या निवडणुकीत बहुमत मिळवणाऱ्या काँग्रेस पक्षात यंदा मोठ्या प्रमाणात गटबाजी होऊन तिकिट वाटपामध्ये गदारोळ झाल्यामुळे काँग्रेस पक्षाला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे.

**भिवंडीत पालिका निवडणूकीसाठी स्वबळाचा नारा देत भाजप, शिवसेना,समाजवादी, काँग्रेस व अपक्ष उमेदवारांनी अर्ज दाखल केले**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

| | |
|---|---|
| f | https://www.facebook.com/jeevandeepnews/ |
| Instagram | https://www.instagram.com/thane_jeevandeep/ |
| X | https://x.com/Jeevandeepvarta |
| www | https://jeevandeepvarta.com/ |

# भविष्यवेध



**गुरुवार**
**०१ जानेवारी २०२६**

**मेष**
तुम्ही अनुभवी आणि जाणकार व्यक्तीच्या मदतीने तुमच्या मुलाच्या करिअरच्या समस्या सोडवू शकाल. काही प्रतिकूल परिस्थिती उद्भवू शकतात.

**वृषभ**
तुमच्या बिझनेसमध्ये खूप गंभीर आणि विचारपूर्वक निर्णय घेण्याची गरज आहे. तुमच्या बिझनेस वाढवण्याच्या योजनांचा पुनर्विचार करा.

**मिथुन**
मोठे किंवा छोटे, कोणतेही निर्णय घेताना तज्ञांचा सल्ला घ्या, मगच पुढे जा. घाईत निर्णय नको, नवविाहीत असाल तर जोडीदार खूप प्रशंसा करेल.

**कर्क**
छोट्याशा गोष्टीने रुसणं टाळा. संध्याकाळी पाहुण्यांचे आगमन घरात आनंददायी वातावरण आणेल. तुमची संपत्ती वाढेल. खर्चही कमी होतील.

**सिंह**
परदेशात जावे लागू शकते,जे खूप फायदेशीर ठरेल. कामावर जबाबदारीची जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे, जी पूर्ण केल्यास फायदेशीर ठरेल.

**कन्या**
तुम्ही एकटे जाऊन एखाद्या धार्मिक स्थळी थोडा वेळ घालवू शकता. आज संध्याकाळी, तुम्ही तुमच्या आईशी तुमच्या भविष्याबद्दल चर्चा कराल.

**तुळ**
कर्मचाऱ्यांशी मैत्रीपूर्ण वर्तन ठेवल्याने त्यांची कार्यक्षमता सुधारेल, काम वेळेपूर्वीच पूर्ण होऊ शकते. महिला त्यांच्या व्यवसायात अधिक सक्रिय असतील.

**वृश्चिक**
सध्या प्रत्येक बारकाव्यावर लक्ष केंद्रित करा आणि परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करा. भूतकाळातील चुका पुन्हा होणार नाहीत याची काळजी घ्या.

**धनु**
नवीन लोकांशी संपर्क साधल्याने तुम्हाला काहीतरी नवीन शिकण्यास मदत होईल. अनुभवाचा वापर करून पुढे जा. लवकरच यश मिळेल, कामात प्रगति होईल.

**मकर**
तुम्ही तुमच्या कुटुंबासोबत दिवस घालवाल. तुम्ही मित्रांसोबत बाहेर फिरायला जाण्याची योजना आखाल. इतरांना प्रभावित करण्यात यशस्वी व्हाल.

**कुंभ**
तुमच्या व्यवसायात नवीन कल्पना सुचतील. नवीन लोकांशी भेटणे आणि बोलणे फायदेशीर ठरेल. समस्येवर तोडगा काढल्याने तुम्हाला दिलासा मिळेल.

**मीन**
तुमचे काम लवकर पूर्ण होईल. येणाऱ्या काळात तुम्हाला अशा व्यक्तीची भेट होईल जो मदत करेल. तुमची नियोजित कामे सहजपणे पूर्ण होतील.

# राज्यभरात युत्या-आघाड्यांचा विचका

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई महानगर क्षेत्रासारखंच चित्र थोड्याफार फरकानं राज्याच्या इतर भागातही दिसून येतंय. पुण्यात शिवसेना आणि भारतीय जनता पक्षानं महानगरपालिका निवडणूक स्वतंत्रपणे लढवण्याचा निर्णय घेतला आहे. नाशिकमधे भाजप स्वबळावर निवडणूक लढेल, अशी घोषणा मंत्री गिरीश महाजन यांनी आज केली. आज उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने भाजपामधल्या इच्छुकांची एबी फॉर्म मिळवण्यासाठी चढाओढ लागली होती. एबी फॉर्म देण्यासाठी पक्षाच्या नेत्यांकडून दोन कोटी रुपये घेतले जात असल्याचा आरोप काही जणांनी केला. याची चौकशी केली जाईल, असं महाजन यांनी सांगितलं. दुसरीकडे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस नाशिकसाठी एकत्र आले आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हे तिन्ही मनसेसोबत एकत्र निवडणूक लढवत आहेत. मालेगावमधे महायुतीच्या तिन्ही घटक पक्षांनी स्वतंत्र लढण्याची घोषणा केली आहे.**



छत्रपती संभाजीनगरमधे भाजप आणि शिवसेना स्वतंत्रपणे लढणार आहेत. शिवसेना नेते तथा पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली.

नागपूरमधे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष स्वबळावर लढणार असून भाजपा आणि शिवसेना यांची युती झाली आहे. तसंच राष्ट्रवादी काँग्रेसनेही स्वबळाचा नारा दिला आहे.

चंद्रपूर महानगरपालिकेसाठी भाजपा आणि शिवसेनेची युती झाली असून राष्ट्रवादी काँग्रेस स्वबळावर लढणार आहे. काँग्रेसने जनविकास सेना पक्षाशी आघाडी केली असून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि वंचित बहुजन आघाडी एकत्र आले आहेत. मनसे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष स्वबळावर मैदानात उतरणार आहेत.

कोल्हापूरमध्ये महायुतीमध्ये एकमत झालं असून ८१ पैकी भाजपा ३६ जागांवर निवडणूक लढवणार असून शिवसेना ३०, तर राष्ट्रवादी काँग्रेसला १५ जागा लढवणार आहे. दुसरीकडे, महाविकास आघाडीमध्ये फूट पडली असून काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट एकत्र आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं तिसऱ्या आघाडीसोबत हातमिळवणी केली आहे.

धुळे महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसची युती झाली आहे. तर भाजपा ६३ जागा स्वबळावर लढवणार आहे. महाविकास आघाडीत काँग्रेस ३०, शिवसेना ३० आणि राष्ट्रवादी काँग्रेस १४ जागा लढवणार आहे.

नांदेड महापालिका निवडणुकीत महायुतीसह महाविकास आघाडीचीही अद्याप घोषणा झाली नाही. लातूरमध्येही भाजपानं स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. आधी राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर निवडणूक लढवण्याचा निर्णय भाजपानं घेतला होता.

जालना महानगरपालिका निवडणुकीतही भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेने स्वबळाचा नारा दिला आहे. जळगाव महानगरपालिका निवडणुकीत मात्र महायुतीच्या घटक पक्षांचं मनोमिलन झालं असून तिन्ही पक्षांनी युती जाहीर केली आहे.

## संजय राऊत बॉम्बची धमकी!

**घराबाहेरील गाडीवर लिहिला संदेश**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

ठाकरेसेनेचे खा. संजय राऊत यांना बॉम्बनं उडवण्याची धमकी देण्यात आल्यानं खळबळ उडाली आहे. त्यांच्या घराबाहेर उभ्या असलेल्या गाडीवर हा धमकीचा संदेश लिहिला होता. पोलिसांना या घटनेची माहिती कळताच तात्काळ ते संजय राऊत यांच्या घरी दाखल झाले आहेत. याठिकाणी त्यांनी राऊत कुटुंबियांची प्राथमिक चौकशी केली. संजय राऊत यांच्या भांडूप येथील 'मैत्री' या बंगल्याबाहेर उभी असलेली 'वॅगन आर' कार बऱ्याच दिवसापासून एकाच जागी उभी आहे. त्यामुळं या कारवर बरीच धूळही बसली आहे. या धूळ बसलेल्या काचेवर कोणीतरी संजय राऊत यांना धमकी देणारा संदेश लिहिला आहे. 'आज हंगामा होगा! आज रात १२.०० am बॉम्ब ब्लास्ट होगा' असं या संदेशात म्हटलं आहे. हा प्रकार पाहिल्यानंतर सर्वात आधी राऊत यांच्या सहकाऱ्यांनी याचे फोटो काढले आणि ते पोलिसांना पाठवले. त्यानंतर पोलीस बॉम्ब शोधक पथकासह घटनास्थळी दाखल होत त्यांनी याची पडताळणी केली. दरम्यान, हा धमकीचा संदेश स्पष्टपणे दिसत असल्यानं पोलिसांनी खबरदारी म्हणून प्राथमिक तपास सुरु केला आहे.

# आम्ही मत देऊ शकत नाही, पण तुम्ही द्या!

## ठाण्यात शालेय विद्यार्थ्यांकडून मतदार जनजागृती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे ( 31) –** 15 जानेवारी रोजी होत असलेल्या ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी सिस्टेमॅटिक वोटर्स एज्युकेशन अँड इलेक्ट्रोल पार्टिसिपेशन (स्वीप) कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत विभागीय क्रीडा महोत्सवाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांनी आम्ही मत देऊ शकत नाही, पण तुम्ही द्या घोषवाक्याखाली मतदानाची जनजागृती केली.




आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौरभ राव यांच्या सूचनेनुसार उपायुक्त तथा नोडल अधिकारी मिताली संचेती यांच्या सहकार्याने नौपाडा–कोपरी प्रभाग समितीच्या निवडणूक निर्णय अधिकारी प्रज्ञा सावंत आणि उथळसर प्रभाग समिती निवडणूक निर्णय अधिकारी उर्मिला पाटील यांच्या पुढाकाराने स्वीप पथकाच्या वतीने नौपाडा–कोपरी प्रभाग समिती आणि उथळसर प्रभाग समिती अंतर्गत या मतदान जनजागृती अभियानाचे आयोजन वीर सावरकर मैदान येथे करण्यात आले होते. या क्रीडा महोत्सवाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांमध्ये मतदानाचे महत्त्व रुजवणे तसेच विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पालकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहोचवण्याच्या उद्देशाने मतदार जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला.

यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी "आम्ही मत देऊ शकत नाही, पण तुम्ही द्या!", "मतदान करा, लोकशाहीचा विजय करा" अशा प्रभावी घोषणा देत नागरिकांचे लक्ष वेधले. मतदानाच्या दिवशी सुट्टीचा गैरवापर न करता सहलीस जाणे किंवा घरी न थांबता मतदान केंद्रावर जाऊन मतदान करावे, असे आवाहन विद्यार्थ्यांनी भावनिक संदेशांच्या माध्यमातून पालकांना केले.

विद्यार्थ्यांनी हातात फलक घेऊन विविध घोषणांद्वारे प्रामाणिक व निर्भय मतदानाचा संदेश दिला. "मतदान करा, मतदान करा, लोकशाहीचा विजय करा" या संकल्पनेतून सर्व नागरिकांनी येत्या 15 जानेवारी 2026 रोजी न चुकता मतदान करावे, असे प्रेरणादायी आवाहन यावेळी करण्यात आले.

या उपक्रमामुळे लहान वयातच लोकशाही मूल्यांची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होत असून नागरिकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक वातावरण तयार होत असल्याचे चित्र दिसून आले.





# परिवहन मंत्री आणि खासदारांच्या मुलांना उमेदवारी नाहीच

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी ठाण्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले. अनेक दिग्गज नेते, माजी नगरसेवक आणि इच्छुकांच्या नावांवर उमेदवारी यादीत फुली मारण्यात आल्याने शिंदे सेनेत नाराजीची लाट उसळली आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे पुत्र पूर्वेश सरनाईक आणि खासदार नरेश म्हस्के यांचे पुत्र आशुतोष म्हस्के यांना उमेदवारी नाकारण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः हा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. प्रभाग क्रमांक १४ मधून माजी नगरसेवक पूर्वेश सरनाईक, तर प्रभाग क्रमांक १९ (आनंदनगर) मधून आशुतोष म्हस्के यांना उमेदवारी नाकारल्याचे स्पष्ट झाल्यानंतर नाराज कार्यकर्त्यांनी मंगळवारी आनंदाश्रम येथे जमून संताप व्यक्त केला.

**ठाणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी शिवसेनेने प्रभाग क्रमांक ६ मधून हणमंत जगदाळे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांसह तीन अन्य उमेदवारांना उमेदवारी जाहीर केली आहे. गत निवडणुकीत आमचा प्रभाग विकासाच्या बाबतीत संथ होता. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आमच्या प्रभागाचा विकास करण्याचे वचन दिल्यामुळे आम्ही शिवसेनेत प्रवेश केला. लोकमान्यनगर आणि शास्त्रीनगर रहिवाशांना हक्काचे आणि प्रशस्त घर देणे हे माझे स्वप्न आहे. आता प्रभागाच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला असून, लवकरच एक वर्षांच्या आत पुनर्विकासाचे काम सुरू होईल.**

**• हणमंत जगदाळे, शिवसेना उमेदवार**

# एसटी बसस्थानक स्वच्छतेसाठी दर 15 दिवसांनी विशेष मोहीम

## प्रवाशांच्या सुरक्षित, आरोग्यदायी प्रवासासाठी एसटी महामंडळाचा पुढाकार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई, दि. ३१ :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व बसस्थानकांवर, बसस्थानक परिसरात तसेच प्रशासकीय इमारतींमध्ये दर १५ दिवसांनी सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवाशांना अधिक स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी सुविधा मिळाव्यात तसेच एसटीची सकारात्मक प्रतिमा अधिक बळकट व्हावी, या उद्देशाने हा महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू करण्यात येत आहे.

या मोहिमेंतर्गत बसस्थानकातील बैठक व्यवस्था, फरशी, भिंती, काच, शौचालये, पिण्याच्या पाण्याची ठिकाणे, महिला विश्रांतीगृहे, कार्यालयीन कक्ष आदींची सखोल स्वच्छता करण्यात येणार आहे. साचलेला कचरा, अनावश्यक झाडे-झुडपे, जाहिरातींचे फलक, जाळी-जळमट यांचे निर्मूलन करून परिसर अधिक स्वच्छ, सुंदर व नीटनेटका केला जाणार आहे. कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र डबे उपलब्ध करून कचऱ्याचे योग्य प्रकारे वर्गीकरण व विल्हेवाट लावली जाणार असून प्रवासी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी स्वच्छता व नियमित देखभाल ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

या अभियानासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संस्था, विद्यार्थी, नागरिक तसेच एसटीचे अधिकारी व कर्मचारी यांच्या सहभागातून ही मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. प्रत्येक बसस्थानकावर या मोहिमेची अंमलबजावणी काटेकोरपणे होईल, याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांवर सोपविण्यात आली आहे.

दर १५ दिवसांनी होणाऱ्या या स्वच्छता मोहिमेमुळे एसटी बसस्थानके अधिक स्वच्छ, आरोग्यदायी व प्रवाशांसाठी आनंददायी ठरणार असून प्रवासी सेवेमध्ये गुणवत्तावाढ होण्यास मदत होणार आहे. या निर्णयामुळे प्रवाशांचा विश्वास अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### आ. किसन कथोरे यांच्या उपस्थितीत

# अंबरनाथच्या अपक्ष नगरसेविका पायल सोरखादे यांचा भाजपात प्रवेश



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ :** अंबरनाथ नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक २९ मधून अपक्ष म्हणून निवडून आलेल्या नगरसेविका सौ. पायल किशोर सोरखादे यांनी आज भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रसंगी मुरबाड विधानसभा मतदार संघाचे आमदतर किसन कथोरे यांनी त्यांचे पक्षात स्वागत करून त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन पायल सोरखादे यांचा प्रवेश हा भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक कार्याला आणि अंबरनाथ परिसरातील जनसंपर्काधिष्ठानाला नवे बळ देणारा ठरेल. त्यांच्या सक्रिय कार्यशैलीमुळे आणि स्थानिक लोकांशी असलेल्या घनिष्ठ संपर्कामुळे अंबरनाथच्या सर्वांगीण विकासाच्या वाटचालीस चालना मिळेल, असा मला विश्वास आहे. अशी प्रतिक्रिया दिली.

भारतीय जनता पक्षात येऊन त्या भाजपच्या "सबका साथ, सबका विकास" या ध्येयधोरणानुसार समाजातील सर्व घटकांच्या प्रगतीसाठी कटिबद्ध राहतील, अशी अपेक्षाही कथोरे यांनी व्यक्त केली.

# ठाणे जिल्ह्यातील हवेचा दर्जा खालावला

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूर:** वातावरणातील घटलेले तापमान आणि त्याचवेळी वाढत जाणारे प्रदुषण यामुळे ठाणे जिल्ह्यातील हवेचा दर्जा खालावल्याचे समोर आले आहे. गेल्या काही दिवसात ठाणे जिल्ह्यात हवेचा गुणवत्ता निर्देशांक कमी झाल्याचे दिसून आले आहे. सोमवारी ठाणे जिल्ह्यातील बदलापूर शहरात हेंद्रेपाडा येथील खासगी हवा गुणवत्ता निर्देशांक मोजणी यंत्रणेत २८०चा आकडा गाठल्याचे दिसून आले. त्या खालोखाल भिवंडी शहरात हवेचा गुणवत्ता निर्देशांक २४०, तर कल्याण येथे २३७, उल्हासनगरात २३० आणि ठाणे शहरात २०८ पर्यंत हा निर्देशांक गेल्याचे समोर आले.

कंपन्यांमधून सोडले जाणारे रासायनिक वायू, रस्त्यावर चिखल, मातीचे लोट, त्यातून होणारी वाहतूक, रस्ते बांधणीची कामे, इमारतींची कामे यामुळे वातावरणातील हवेची गुणवत्ता खालावते. परिणामी हवेचा गुणवत्ता निर्देशांक वाढल्याचे दिसून येते. सध्या राज्यातील विविध शहरांमध्ये वातावरणात गारवा जाणवतो आहे. मात्र त्याच सोबत हवेचा निर्देशांकही वाढत असल्याचे दिसून आले आहे. ठाणे जिल्ह्यातील हवेचा गुणवत्ता निर्देशांक गेल्या काही दिवसात खालावल्याचे समोर आले आहे. एक्युआय या खासगी संस्थेच्या यंत्रणेत झालेल्या नोंदीनुसार ठाणे जिल्ह्यातील जवळपास सर्वच शहरांमध्ये हवेचा दर्जा खालावल्याचे दिसून आले आहे.

# मिरा-भाईंदरमध्ये सर्वच पक्षांचा स्वबळाचा नारा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भाईंदर :** अखेरच्या क्षणापर्यंत युती व जागावाटपाचा ठोस निर्णय न झाल्यामुळे मिरा-भाईंदरमध्ये महायुती आणि महाविकास आघाडीचे गणित बिघडले. परिणामी, प्रमुख राजकीय पक्षांनी स्वबळावर निवडणूक लढवण्याचा नारा देत उमेदवार उतरवले असून, आगामी महापालिका निवडणूक रंगतदार होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मिरा-भाईंदर महापालिकेच्या ९५ जागांसाठी निवडणूक घोषित झाली असून ३० जानेवारी रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत होती. या निवडणुकीसाठी सुरुवातीला प्रमुख पक्ष युतीत लढणार असल्याचे चित्र होते. शहरात सत्ताधारी भूमिकेत असलेल्या भाजप-शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात जागावाटपावरून चर्चा सुरू होती. तर महाविकास आघाडी म्हणून काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस व मनसे यांनी एकत्र निवडणूक लढवण्याची घोषणा केली होती.

मात्र अखेरच्या दिवसापर्यंत भाजप-शिवसेना युतीचा निर्णय होऊ शकला नाही. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसला आठ जागा देण्यात आल्या असतानाही अधिक जागांची मागणी केल्याने तिढा वाढला. परिणामी, अखेरच्या क्षणी एबी फॉर्म देऊन तिन्ही पक्षांनी २४ प्रभागांत स्वतंत्र उमेदवार दिले.

दुसरीकडे, महाविकास आघाडीतील पक्षांमध्येही बहुतांश जागांवर एकमत न झाल्याने काँग्रेस, शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस व उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेने सर्वच प्रभागांत स्वतंत्र उमेदवार उतरवले. त्यामुळे आगामी निवडणूक बहुरंगी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# प्रदुषणकारी बांधकामांना पनवेल मनपाची नोटीस

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पनवेल - पनवेल शहरातील वाढते वायू प्रदूषण आणि बांधकामांमुळे निर्माण होणारी धूळ याबाबत पनवेल महानगरपालिकेने कठोर भूमिका घेतली आहे. मनपाने दिलेल्या सूचनांचे संपूर्ण पालन न केल्यास बांधकाम व्यावसायिकांवर कोणतीही तडजोड न करता कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी दिला.**

पनवेल मनपा कार्यक्षेत्रातील सर्व प्रभागांमध्ये सुरू असलेल्या १७० हून अधिक लहान-मोठ्या बांधकाम स्थळांची प्रभागस्तरीय पर्यावरण समितीने पाहणी केली.

या पाहणीत मोठ्या प्रमाणात धूळ नियंत्रणाचे नियम पाळले जात नसल्याचे आढळून आले. यावर आयुक्तांनी तीव्र नाराजी व्यक्त केल्यानंतर नगररचना विभागाने पुनः पाहणी केली. त्यात ७० बांधकाम ठिकाणी गंभीर नियमभंग आढळल्याने संबंधितांना बांधकाम थांबविण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या. तरीही शहरातील हवेतील धूलीकणांचे प्रमाण चिंताजनक पातळीवर असल्याने आणि न्यायालयानेही वारंवार प्रदूषणाबाबत चिंता व्यक्त केल्यामुळे बुधवारी महापालिका मुख्यालयात बांधकाम व्यावसायिकांची विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीत आयुक्त चितळे यांनी अधिकाऱ्यांसह बांधकाम व्यावसायिकांना स्पष्ट शब्दांत इशारा देत नियम पाळण्याचे आदेश दिले. बैठकीस अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, सहाय्यक नगररचनाकार केशव शिंदे, उपायुक्त स्वरूप खारगे, रचना सहाय्यक अनिकेत दुर्गावळे, मुख्य आरेखक नितीन हुद्दार उपस्थित होते. हवा प्रदूषण, स्वच्छता आणि कामगार सुरक्षेच्या दृष्टीने उच्च न्यायालयाने घालून दिलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना काटेकोरपणे राबविण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

# पालघर जिल्ह्यात जलसंधारण योजनांना गती मिळणार - जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पालघर :** पालघर जिल्ह्यात केंद्र व राज्य शासनाच्या जलसंधारणाशी संबंधित विविध महत्त्वाकांक्षी योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय आढावा बैठक संपन्न झाली या वेळी जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी शासनाच्या सकारात्मक धोरणामुळे जिल्ह्यामध्ये जलसंधारण योजनांना गती मिळणार असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी केले. जिल्हाधिकारी



कार्यालय येथे संपन्न झालेल्या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, उपजिल्हाधिकारी (सामान्य) रणजित देसाई, उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.) विजया जाधव तसेच जलसंधारण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत सदस्य सचिव तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी फरीद खान यांनी योजनानिहाय प्रगतीचा आढावा सादर केला. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत मृद व जलसंधारण विभाग, जिल्हा परिषद, वन विभाग व कृषी विभागामार्फत एकूण १,३५२ कामे पूर्ण झाल्याची माहिती देण्यात आली. याबाबत समाधान व्यक्त करताना, जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी योजनेची गती आणखी वाढवण्यासाठी सर्व यंत्रणांनी लक्ष लक्ष घालावे असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी दिले. राज्य शासनाच्या जलयुक्त शिवार २.० योजनेंतर्गत इतर योजनांतून १,४७१ कामे तर विशेष निधीतून ७८९ कामे पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले. कामांची गुणवत्ता राखत योग्य नियोजनाने वेळेत कामे पूर्ण करण्यावर भर देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ इंदु राणी जाखड यांनी दिले. लघुसिंचन योजनांची ७ वी प्रगणना व जलसाठ्याची २ री प्रगणना अंतर्गत १,००९ गावांमध्ये प्रगणना कामे सुरू असून, ही कामे मृद व जलसंधारण विभागामार्फत होत आहेत. तसेच प्रत्यक्ष स्थळपडताळणी योजनेअंतर्गत २८,५३९ कामांपैकी ११,२११ कामांचे मॅपिंग पूर्ण झाले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. याबाबत प्रगती वेगाने पूर्ण करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी दिले. गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार आणि नाला खोलीकरण व रुंदीकरण योजनेंतर्गत ४ कामे पूर्ण होऊन १६,५२० घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. तलासरी तालुक्यातील अनवीर दाभाडेपाडा नाला खोलीकरणाचे काम पूर्ण झाल्याची माहिती देण्यात आली. पावसाळ्यापूर्वी गाळ काढण्याची कामे पूर्ण करून गाव तलाव व नाल्यांतील पाणीसाठा वाढवण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ इंदु राणी जाखड यांनी दिले.





# वर्ष अखेर व नववर्ष स्वागतासाठी कल्याण पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : परिमंडळ ३ कल्याण मध्ये 'दि.३१ डिसेंबर वर्ष अखेर व नववर्ष स्वागतासाठी कडेकोट पोलीस बंदोबस्त लावण्यात आला असल्याची माहिती पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी दिली. परिमंडळ ३ कल्याण अंतर्गत कल्याण व डोंबिवली शहरात दि. 31 डिसेंम्बर रोजी रात्री 11 ते दि. 1 जानेवारी रोजी पहाटे 5 वाजेपर्यंत 'नववर्ष स्वागत' अनुषंगाने सर्व पोलीस ठाणे हददीत नमुद प्रमाणे पोलीस बंदोबस्त लावण्यात येणार आहे.हा बंदोबस्त फिक्स पॉईंट व कारवाई करीता परिमंडळ ३ कल्याण मधील पोलीस ठाणे हददीत ८ ठिकाणी नाकाबंदी लावण्यात येणार आहे. पोलीस ठाणेतील अधिकारी कर्मचारी व कल्याण डोंबिवली शहर वाहतुक शाखा संयुक्तीकपणे नाकाबंदी दरम्यान वाहने तपासण्यात येवुन, मद्यप्राशन करून वाहन चालविणारे वाहन चालकांची ब्रेथ ॲनालायझर व्दारे तपासणी करून मोटर वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे सर्व पोलीस ठाणे हददीत साध्या वेशात ८ विशेष पथके नेमण्यात येणार आहे. या पोलीस बंदोबस्तात 1पोलीस उप आयुक्त, 2 सहा. पोलीस आयुक्त, 22 पोलीस निरीक्षक, 69 पोलीस उपनिरीक्षक सहाय्यक पोलीस निरीक्षक, 474 पुरुष कर्मचारी, 120 महिला कर्मचारी आणि एक एसआरपीएफ ची प्लाटुन तैनात करण्यात आली असल्याची माहिती पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी दिली.

# शुक्रवारी ठाण्यात पाणी नाही

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (31)** : ठाणे महापालिकेच्या घोडबंदर परिसरात पाणी पुरवठा करणारी हरिदास नगर येथील मुख्य जलवाहिनी वरील 700 मि.मी व्यासाची झडप (valve) नादुरूस्त झाली आहे. परिणामी या परिसरातील पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला असून सदर वॉल्व बसविणे अत्यावश्यक असून नवीन वॉल्व बसविणेसाठी शु क्रवार दिनांक 02/01/2026 रोजी सकाळी 9.00 ते 9.00 पर्यंत ठाणे महानगरपालिका व स्टेम प्राधिकरणाकडून होणाऱ्या पाणीपुरवठा योजनेचा शटडाऊन घेण्यात येणार आहे.

परिणामी, दिनांक शुक्रवार दिनांक 02/01/2026 रोजी सकाळी 9.00 ते रात्री 9.00 वाजेपर्यंत घोडबंदर रोड, लोकमान्यनगर, वर्तकनगर, साकेत, ऋतूपार्क, जेल, गांधीनगर, सिध्दांचल, इंदिरानगर, रुपादेवी, श्रीनगर, समतानगर, सिध्देश्वर, इटरनिटी, जॉन्सन, मुंब्रा व कळव्याचा काही भागात 12 तासांसाठी पूर्णपणे पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

पाणी कपातीच्या कालावधीत नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करुन ठाणे महानगरपालिकेस सहकार्य असे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

# सेवानिवृत्त कर्मचा-यांना भिवंडी महानगरपालिकेचा निरोप

महानगरपालिका सेवेतून नियत वयोमानानुसार 5 कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर, भा.प्र.से. यांनी दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेतर्फे सेवानिवृत्त कर्मचा-यांना कार्यक्रमाच्या माध्यमातून निरोप देणेत आला. याप्रसंगी महानगरपालिकेचे मा. सहाय्यक आयुक्त आरोग्य श्री. शैलेश दोंदे यांच्या हस्ते सदर सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त कर्मचा-यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला आणि त्यांना त्यांच्या पुढील आयुष्याकरीता शुभेच्छा दिल्या.

महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमातीच्या तिसरा मजल्यावरील कॉन्फ़रन्स हॉल येथे संपन्न झालेल्या या निरोप समारंभाच्या कार्यक्रमात 1) श्री.शाहीरा सुदर्शन (लिपीक) बांधकाम विभाग,2) श्री. भरत बाळकृष्ण नाटेकर (वहानचालक), 3) श्री. बाळु नामपेल्ली बिदुल (सॅ. कामगार) प्रभाग समिती क्र. 04, 4) श्री. मुकेश बलवंत सुळे (हेल्पर), 5) श्री. निरा नरेंद्र चव्हाण (सॅ. कामगार) प्रभाग समिती क्र. 1, अशा 5 कर्मचा-यांना महानगरपालिकेच्यावतीने आज निरोप देण्यात आला. याप्रसंगी वाहन विभागाचे शेखर चौधरी व महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी, सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त कर्मचा-यांचे कुटुंबातील सदस्य इ. उपस्थित होते.

# अपक्ष करिष्मा चिकणकरांमुळे भाजप संकटात

- प्रभाग १६-ब मध्ये बंडखोरीचा स्फोट
- आगरी मतदारांचा कौल भाजपविरोधात ? नेवाळी आंदोलनाचा फटका भाजपला




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल होताच प्रचाराला वेग आला असून प्रभाग क्रमांक १६-ब मध्ये राजकीय समीकरणे ढवळून निघाली आहेत. या प्रभागातून भाजपच्या अधिकृत उमेदवाराविरोधात बंडखोरी उघडपणे समोर आली असून करिष्मा अमित चिकणकर यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केल्याने भारतीय जनता पार्टी अडचणीत सापडली आहे. या प्रभागात भाजपाकडून इंदिरा तरे यांनी अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मात्र, अपक्ष मैदानात उतरलेल्या करिष्मा चिकणकर या भूमीपुत्रांच्या आंदोलनातील सक्रिय चेहरा म्हणून ओळखल्या जातात. देशभर गाजलेल्या नेवाळी आंदोलनात त्यांचे पती अमित चिकणकर यांनी सक्रीय सहभाग घेतला होता. या आंदोलनादरम्यान त्यांनी जेलची वारीही केली होती. त्यामुळे आगरी समाजात तसेच स्थानिक भूमीपुत्रांमध्ये त्यांची मजबूत पकड निर्माण झाली आहे.

प्रभाग क्रमांक १६-ब मध्ये चिंचपाडा, नांदीवली, अंबरनाथ , भाल, वसार , द्वारली तर्फे आशेळे, कृष्णा नगर आणि माणेरे या गावांचा समावेश आहे. या भागात सर्वाधिक मतदार आगरी समाजाचे असल्याने हा घटक निकालात निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. चिकणकर यांचे पती भाजपचे पदाधिकारी असले तरी स्थानिक प्रश्नांवर घेतलेली ठाम भूमिका आणि भूमीपुत्रांच्या प्रत्येक लढ्यातील त्यांचा सहभाग यामुळे ग्रामस्थांचा कल चिकणकर यांच्याकडे झुकत असल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

स्थानिक विकासकामे, २७ गावांचे प्रश्न, नेवाळी जमीन प्रश्न, ग्रामस्थांचे हक्क आणि आंदोलनातील सातत्य यामुळे करिष्मा अमित चिकणकर यांना मोठा जनसमर्थन लाभत आहे. त्यामुळे अधिकृत भाजप उमेदवाराला या प्रभागात कडवी झुंज द्यावी लागणार असून, बंडखोरीचा फटका भाजपला बसण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसत आहेत. निवडणुकीच्या रणधुमाळीत प्रभाग १६-ब हा भाजपसाठी डोकेदुखी ठरणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. २७ गावांमध्ये सुरू असलेल्या बंडखोरीला वेळीच आवर घालण्याचे आव्हान भाजपा नेतृत्वाकडे असणार आहे.

# भिवंडीत भाजपाकडून नवीन - जुन्या चेहऱ्यांना पसंती

## शक्तिप्रदर्शन करीत उमेदवारांनी अर्ज दाखल केले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी शहर महापालिकेचे सार्वत्रिक निवडणुकीतसाठी काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, समाजवादी पक्ष, शिवसेना (ठाकरे) मनसे,कोनार्क विकास आघाडी व भारतीय जनता पक्ष व अपक्ष उमेदवारांनी शक्ती प्रदर्शन करत आपले उमेदवारी अर्ज काल मोठ्या उत्साहामध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल करून आपल्या प्रचाराचे कार्य सुरू केले




आहे.

भारतीय जनता पक्षाने नवीन व काही जुन्या चेहऱ्यांना पसंती देत पक्षातर्फे उमेदवारी दिली.

आहे.जाहीर झालेल्या १८ नावां पैकी ३ माजी नगरसेवक आहेत तर एका नगरसेवक पत्नीला उमेदवारी जाहीर झाली आहे.तर १४ चेहरे नवीन आहेत.प्रभाग क्रमांक १६ मध्ये ३ नव्या चेहऱ्यांना भाजपाने संधी दिली आहे.माजी नगरसेविका क्षमा मनोज ठाकूर,राजेश शेट्टी,परेश ( राजु) चौघुले, स्नेहा मेहुल पाटील,२२ मध्ये माजी नगरसेवक श्याम अग्रवाल,विठोबा नाईक ,प्रभाग क्रमांक २३ मध्ये माजी नगरसेवक निलेश चौधरी, नारायण चौधरी,भारती हनुमान चौधरी व दिव्या पाटील, प्रभाग क्रमांक १ मधून मित महेश चौघुले,ॲड रितेश टावरे,पद्मा कृष्णा गाजंगी,स्नेहा विकास बाफना तर प्रभाग क्रमांक ६ मध्ये ॲड वैभव एकनाथ भोईर,दक्षाबेन भूपेंद्र पटेल,मीना कुंटे,विशाल दत्तात्रय डुंबरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

उमेदवारी अर्ज भरण्या साठी वाजतगाजत शक्तीप्रदर्शन मिरवणूक काढून भाजप व इतर पक्षाच्या उमेदवारांनी मंगळवारी मोठी गर्दी भिवंडी शहरातील विविध ठिकाणी असलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय येथे झाली होती तर भाजपा उमेदवार निलेश चौधरी,नारायण चौधरी यांनी ताडाळी येथून जोरदार शक्तिप्रदर्शन करीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.तर कोनार्क विकास आघाडीचे प्रमुख माजी महापौर विलास पाटील यांनी सुध्दा आपले सहकारी उमेदवारांना सोबत घेऊन कोंबडपाडा येथील गाजेंगी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात जाऊन उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

# ठाणे महापालिका निवडणुकीसाठी काटेकोर नियोजन

## 33 केंद्रांमध्ये 2013 मतदान कक्षांची तयारी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (31)** : ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 पंधरा दिवसांवर येवून ठेपली असून त्या दृष्टीने ठाणे शहरातील मतदान केंद्रांच्या भौतिक सुविधांचे सखोल नियोजन पूर्ण झाले असून, निवडणूक प्रशासनाने मतदान केंद्रनिहाय मजल्यानुसार कक्षांची सविस्तर माहिती जाहीर केली आहे. या माहितीनुसार शहरातील 33 मतदान केंद्रांमध्ये एकूण 2013 मतदान कक्ष कार्यान्वित करण्याची तयारी सुरू असल्याचे आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौरभ राव यांनी नमूद केले.

ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभागसमितीनिहाय मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात येत असून माजिवडा मानपाडा प्रभाग समितीमध्ये 266, वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत 186, लोकमान्यनगर-सावरकरनगर प्रभागसमितीमध्ये 242, कळवा प्रभाग समितीअंतर्गत 263, उथळसर प्रभाग समितीमध्ये 158, वागळे प्रभाग समितीमध्ये 160, नौपाडा कोपरी प्रभागसमितीमध्ये 214, मुंब्रा प्रभाग समितीमध्ये 269 आणि दिवा प्रभाग समितीमध्ये 255 मतदान केंद्र असणार आहेत. मतदारांना सुलभ, सुरक्षित व पारदर्शक मतदान करता यावे यासाठी केंद्रांची रचना काटेकोरपणे करण्यात आली आहे. यामध्ये तळमजल्यावर 1207 कक्ष, पार्टीशन स्वरूपातील 361 कक्ष, मंडपामध्ये 403 कक्ष, तर पहिल्या मजल्यावर 42 कक्ष उपलब्ध असणार आहेत.

प्रत्येक मतदान केंद्रावर प्रवेश व निर्गमनासाठी स्वतंत्र व्यवस्था, मतदान अधिकारी व पोलीस बंदोबस्त, सीसीटीव्ही यंत्रणा तसेच ईव्हीएम व बॅलेट युनिट यंत्रांची सुरक्षित मांडणी करण्याच्या सूचना प्रशिक्षण वर्गात मतदन केंद्राध्यक्षांना देण्यात आल्या आहेत. मतदारांची गर्दी नियंत्रित ठेवून मतदान प्रक्रिया वेळेत पार पडावी, यासाठी कक्षांची संख्या व मांडणी नियोजनपूर्वक करण्यात येणार आहेत.

ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, गर्भवती महिला तसेच आजारी मतदारांना मतदान करताना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी तळमजल्यावर अधिकाधिक कक्ष ठेवण्यात आले आहेत. आवश्यक त्या ठिकाणी रॅम्प, रेलिंग, व्हीलचेअर, पिण्याचे पाणी, सावलीची व्यवस्था तसेच प्राथमिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या असल्याचे आयुक्तांनी सांगितले. निवडणूक कामकाजासाठी नेमण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रांच्या रचनेबाबत आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले असून, मतदानाच्या दिवशी कोणताही गोंधळ होऊ नये यासाठी मॉक ड्रिल व पूर्वतयारी तपासणी केली जाणार आहे.

# नवीन वर्षाच्या सुरुवातीला सिद्धगडावरील रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सुरू होणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : गेली अनेक वर्ष प्रलंबित असलेल्या जांभूर्डे ते सिद्धगड बलिदान भूमी पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास मंजुरी मिळाली आहे हा रस्ता पक्का करण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम पूर्ण होणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे देण्यात आली

रस्त्याचे काम वेगाने सुरू आहे सिद्धगड येथे एक व दोन जानेवारी रोजी हुतात्मा भाई कोतवाल व हुतात्मा हिराजी पाटील यांच्या बलिदान दिनानिमित्त विविध कार्यक्रम केले आहेत ठाणे , रायगड , पुणे जिल्ह्यातून या समारंभासाठी मोठ्या संख्येने लोक उपस्थित राहतात शेकडो शालेय विद्यार्थी सिद्धगडावर उपस्थित राहून देशभक्तीपर कार्यक्रम सादर करतात. या समारंभाची तयारी पूर्ण होत आली आहे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे बलिदान भूमी पर्यंत जाणाऱ्या रस्त्याची





**सिद्धगड येथे जाण्यासाठी पक्का डांबरी रस्ता तयार करण्यात यावा म्हणून गेली 25 वर्षे लोकप्रतिनिधी प्रयत्न करत होते दरवर्षी 2 जानेवारी रोजी हुतात्मा ज्योत प्रज्वलित करण्यासाठी सिद्धगड येथे येणारे तत्कालीन पालकमंत्री गणेश नाईक , त्यांच्यानंतर एकनाथ शिंदे यांचे सह मुरबाडचे माजी आमदार गोटीराम भाऊ पवार , कै दिगंबर वीशे , विद्यमान आमदार किसन कथोरे त्यासाठी सातत्याने पाठपुरावा करत होते परंतु वनखात्याची परवानगी मिळत नव्हती यावर्षी मात्र वनखात्याची परवानगी मिळाली आहे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कंत्राट मंजूर करण्यात आले सदर काम करण्यासाठी वर्क ऑर्डर देण्यात आली आहे त्यामुळे पुढील महिन्याच्या आत या रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे काम पूर्ण होणार असल्याचा अंदाज आहे**

**एक जानेवारी 2026 रोजीच्या सायंकाळपासून कार्यक्रमाला सुरुवात होणार आहे रात्रभर कार्यक्रम सुरू राहणार आहेत सकाळी सहा वाजून दहा मिनिटांनी हुतात्मा ज्योत प्रज्वलित करून हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात येणार आहे**

**भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झालेल्या हुतात्मा हिराजी पाटील व हुतात्मा भाई कोतवाल यांना सिद्धगड येथील डोंगराच्या कपारी मध्ये ब्रिटिशांनी केलेल्या गोळीबारात 2 जानेवारी 1943 रोजी पहाटे सहा वाजून दहा मिनिटांनी हुतात्मा हिराजी पाटील यांना वीर गती प्राप्त झाली होती त्यानंतर हुतात्मा भाई कोतवाल यांना ब्रिटिशांनी ठार मारले होते या घटनेनंतर स्वातंत्र्य सैनिक हरिभाऊ भडसावळे यांनी सिद्धगडाच्या जंगलातील या ठिकाणाचा शोध घेऊन या क्रांतिकारकांची आठवण म्हणून 1946 पासून सिद्धगडाच्या जंगलात ज्या ठिकाणी या दोन क्रांतीकारकांना वीरमरण आले त्या ठिकाणी त्याच वेळी या हुतात्म्यांना आदरांजली वाहण्याची प्रथा सुरू केली त्यावेळी त्यांचे बरोबर अनेक स्वातंत्र्यसैनिक तेथे उपस्थित राहत होते**

दुरुस्ती व रस्त्यावर माती टाकण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे जांबुर्डे ते सिद्धगड या आठ किलोमीटरच्या घाट रस्त्यावर पहाटेच्या अंधारातून येणाऱ्या वाहनांना रस्ता दिसावा म्हणून रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या झाडांना चुना व गेरू लावून रंगरंगोटी करण्यात आली आहे त्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या वाहनांना अडचण निर्माण होणार नाही

सिद्धगड हे ठिकाण मुरबाड पासून 25 किलोमीटर अंतरावर भीमाशंकर अभयारण्यातील जंगलात आहे तेथे तेथे जाण्यासाठी गुरांच्या बाजारासाठी महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेल्या म्हसा गावापासून रस्ता आहे मुरबाड किंवा कर्जत , नेरळ येथून म्हसा व त्यापुढे जांभुर्डे गावा जवळून सिद्धगडावर जाण्यासाठी रस्ता आहे मुरबाड एसटी आगारातर्फे एक जानेवारी सायंकाळी चार पासून सिद्धगड येथे जाण्यासाठी एसटी बस सुटणार आहे प्रवाशांनी आगारा संपर्क साधावा असे आवाहन एसटी प्रशासनाने केले आहे

# निवडणूक प्रशिक्षणास गैरहजर कर्मचाऱ्यांना 'कारणे दाखवा नोटीस'

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (31) :** येत्या 15 जानेवारी 2026 रोजी होणाऱ्या ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घेण्यात येणाऱ्या निवडणूक प्रशिक्षणास गैरहजर राहिलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध महापालिका प्रशासनाने अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. गैरहजर अधिकारी कर्मचारी यांना 'कारणे दाखवा नोटीस' बजावण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली असून नोटीस मिळाल्यानंतरही जे अधिकारी कर्मचारी हजर होणार नाही त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही प्रस्तावित केली जाणार असल्याचे आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौरभ राव यांनी स्पष्ट केले आहे. निवडणूक प्रशिक्षणास अनुपस्थित राहणे, हे केवळ शिस्तभंग नसून निवडणूक कायद्याचा गंभीर भंग असल्याचेही आयुक्तांनी नमूद केले.

निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निर्भय व कायद्यानुसार पार पाडण्यासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येते. ठाणे महानगरपालिकेच्या वतीने दिनांक 27,28 व 29 डिसेंबर रोजी राम गणेश गडकरी रंगायतन व डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे पहिले प्रशिक्षण दोन सत्रात आयोजित करण्यात आले होते. मात्र, पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षणास काही अधिकारी व कर्मचारी गैरहजर राहिल्याचे निदर्शनास आले असून संबंधित कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येत आहे. नोटिसीला समाधानकारक उत्तर न दिल्यास त्यांच्याविरुद्ध पुढील कठोर कारवाई केली जाणार आहे.

### कडक कारवाईचा इशारा फौजदारी गुन्हा दाखल होणार

दुसऱ्या प्रशिक्षण सत्रास सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कोणतेही कारण न देता अनिवार्यपणे उपस्थित राहावे. प्रशिक्षणास पुन्हा गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध निवडणूक कायदा व भारतीय दंड संहितेनुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्यासह शिस्तभंगात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नियुक्ती झाल्यानंतर प्रशिक्षणात सहभागी होणे हे प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याचे कर्तव्य असून, त्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे लोकशाही प्रक्रियेच्या कामात अडथळा आणण्यासारखे आहे. त्यामुळे कोणतीही चालढकल किंवा निष्काळजीपणा अधिकारी कर्मचाऱ्यांनी करु नये, नोटीस मिळाल्यानंतर ठाणे महापालिकेतील पहिल्या मजल्यावर स्थापन करण्यात आलेल्या निवडणूक आस्थापना विभागाशी संपर्क साधावा व दुसऱ्या प्रशिक्षणाचा आदेश प्राप्त करुन घ्यावा, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.







Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024